वनाचे सर्व्हेक्षण, जमाबंदी व सिमांकन योजनेचा सन २०१५-१६ करिता निधी वितरीत करण्याबाबत.. (४४०६-००५३).

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०१५/प्र.क्र.२१५/फ-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २८ जानेवारी, २०१६.

वाचा :-

१) अपर प्रधान मुख्य वनंसरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) यांचे पत्र क्र.-कक्ष-२४(३)/वअ / ४७९/१५-१६, दिनांक ७.८.२०१५.
२) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ३.६.२०१५, दिनांक २१.७.२०१५ व दिनांक १.१०.२०१५.
३) शासन निर्णय क्र.एस-१०/२०१५/अनौ.२९/प्र.क्र.४४५/फ-३, दिनांक ३.११.२०१५.
४) शासन निर्णय व शासन शुध्दीपत्रक क्र. एस-१०/२०१५/अनौ.२९/प्र.क्र.४४५/फ-३, दिनांक ३.११.२०१५.
५) वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.अंर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.०४.२०१५.
६) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अंर्थसं-२०१५/प्र.क्र.२०१/अर्थ-३, दि.१.०१.२०१६.
७) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अंर्थसं-२०१५/प्र.क्र.२०१/अर्थ-३, दि.१२.०१.२०१६.

प्रस्तावना :

राज्य योजनेअंतर्गत सन २०१५-१६ करीता वनांचे सर्व्हेक्षण, जमाबंदी व सिमांकन यासंदर्भात उपशिर्ष (४४०६-००५३) योजनांतर्गत एकूण रु. १५००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर असून त्याच्या ७० टक्के प्रमाणात रू. १०५०.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला होता. उर्वरित रु.४५०.०० लक्ष इतका नियतव्यय हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आला आहे.

औरंगाबाद वनवृत्तांतर्गत विविध वनखंडांच्या हद्दीत संरक्षक भिंत बांधकाम करण्याकरिता राज्य योजनेअंतर्गत सन २०१५-१६ करीता वनांचे सर्व्हेक्षण, जमाबंदी व सिमांकन यासंदर्भात उपशिर्ष (४४०६-००५३) अंतर्गत रु.५,१२,०१,२००/- (एकूण ५ अंदाजपत्रके) च्या प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या अनौस.क्र.४४७/१५/इमा-३, दिनांक २७.१०.२०१५ अन्वये सहमती दिली आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र. ३ व ४ येथील दिनांक ३.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. आता अर्थसंकल्पित तरतुदीच्या मर्यादेत राहून तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध होणाऱ्या मासिक निधी प्रवाहानुसार औरंगाबाद वनवृत्ताच्या सदर कामासाठी निधी वितरित करण्याचे प्रस्तावित आहे.

वित्त विभागाच्या दिनांक १.०१.२०१६ च्या परिपत्रकानुसार, सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये मंजूर झालेल्या पूरक मागण्यांचे ५० % मर्यादेत निधीचे वितरण करण्याचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागांना प्रदान केले आहेत. तसेच दिनांक १२.०१.२०१६ च्या परिपत्रकानुसार एकूण वार्षिक तरतुदीच्या ७०% ही पूर्वीची मर्यादा तशीच ठेवण्यात आली आहे. या व्यतिरिक्त ०२ मजूरी या उदिष्टांतर्गत आता १०० % निधी वितरणास तरतूद उपलब्ध करुन दिला आहे.

प्रकरणी अर्थसंकल्पित एकूण रु.१५००.०० लक्ष (०२ मजूरी- रु. ३५.०० लक्ष, लहान बांधकामे- रु.१५.०० लक्ष व ५३ मोठे बांधकामे - रु.१४५०.०० लक्ष) निधी पैकी आतापर्यंत संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयांन्वये एकूण रु. ७३४.५६/- लक्ष (०२ मजूरी-रु.१७,११,५२५/-, २७ लहान बांधकामे- रु.७,३४,५६०/- व ५३ मोठे बांधकामे - रु. ७,१०,०९,९१५/-) निधी वितरीत करण्यात आलेला आहे. वित्त विभागाच्या दिनांक १.१.२०१६ व दिनांक १२.१.२०१६ रोजीच्या परिपत्रकातील सुचनेनुसार निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय:

सन २०१५-१६ करिता "वनाचे सर्वेक्षण, जमाबंदी व सिमांकन" (४४०६ ००५३) या योजनेअंतर्गत एकूण रु.१५००.०० लक्ष अर्थसंकल्पीत निधीच्या मर्यादेत प्रस्तावांतर्गत औरंगाबाद वनवृत्तांतर्गत विविध वनखंडांच्या हद्दीत संरक्षक भिंत बांधकाम करण्याकरिता आवश्यक रु. ५,१२,०१,२००/- निधी पैकी सद्य:स्थितीत **रुपये २३८.०४ लक्ष** (०२ मजूरी- रु.१७,८८,४७५ + २७ लहान बांधकामे रु.२,२५,४४० + ५३ मोठे बांधकामे रु.२,१७,९०,०८५) इतका निधी पुढील तपशिलानुसार तसेच अटींच्या अधीन राहून खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे :-

अ.क्र.	कामाचे नाव	प्रशासकिय मान्यता प्रदान रक्कम (लाखात)	वितरित रक्कम (लाखात)
१	औरंगाबाद वनपरिक्षेत्रांतर्गत मौजे सातारा येथील वनखंड क्र.२८७ च्या हद्दीवर १६०५.०० र.मी.ची संरक्षक भिंत बांधणे.	१२१.१८०	५६.३३७
२	औरंगाबाद वनपरिक्षेत्रांतर्गत मौजे कुंभेफळ येथील वनखंड क्र.२२० च्या हद्दीवर १६२३.०० र.मी.ची संरक्षक भिंत बांधणे.	१२२.५३३	५६.९७०
३	औरंगाबाद वनपरिक्षेत्रांतर्गत मौजे देवळाई येथील वनखंड क्र.२८६ च्या हद्दीवर ९५१.०० र.मी.ची संरक्षक भिंत बांधणे.	७१.९६७	३३.४५७
४	खुल्ताबाद वनपरिक्षेत्रांतर्गत मौजे भावसिंगपूरा येथील वनखंड क्र.१९९ च्या हद्दीवर ९९९.०० र.मी.ची संरक्षक भिंत बांधणे.	७६.३३२	३५.४८७
५	खुल्ताबाद वनपरिक्षेत्रांतर्गत मौजे मिटमीटा येथील वनखंड क्र.१९८ च्या हद्दीवर १५५१.०० र.मी.ची संरक्षक भिंत बांधणे.	१२०.०००	५५.७८९
	एकूण	**५१२.०१२**	**२३८.०४०**

१) ज्या प्रयोजनासाठी खर्चास मंजूरी देण्यात आली आहे, त्याच प्रयोजनावर निधी खर्च करण्यात यावा.
२) यामध्ये कोणत्याही प्रकारची वित्तिय अनियमितता होणार नाही, याची पुरेपूर दक्षता घेण्यात यावी.
३) वित्त विभागाने दिनांक ११/७/२००१ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या वित्तिय मर्यादा यापुढेही लागू राहतील.
४) सदर मान्यता ही सन २०१५-१६ या कालावधी करिताच देण्यात येत आहे.
५) सदर बांधकाम करताना वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

सदर खर्च हा मागणी क्रमांक- सी-१०, ४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च राज्य योजनांतर्गत योजना वनाचे सर्वेक्षण, जमाबंदी व सिमांकन (४४०६-००५३) या शीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०१५-१६ मध्ये मंजूर अर्थसंकल्पित अनुदानातून भागविण्यात यावा. निधी खर्च करताना वित्त विभागाने मासिक निधी विवरणपत्र तसेच इतर बाबतीत दिलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक १७.४.२०१५ रोजीचा शासन निर्णय तसेच वित्त विभागाच्या अनुक्रमे दिनांक १.०१.२०१६ व दिनांक १२.०१.२०१६ रोजीची परिपत्रके आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक विअप्र-१००८/प्र.क्र७०/२००८/विनियम, दिनांक १५/५/२००९ भाग पहिला उप विभाग-३ परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०१२८१३२३०४५०१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

TIWARI VIRENDRA RAMBAHAL

Digitally signed by TIWARI VIRENDRA RAMBAHAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917243, postalCode=400032, st=Maharashtra, cn=TIWARI VIRENDRA RAMBAHAL
Date: 2016.01.28 13:23:27 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)

मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) महाराष्ट्र राज्य, नागपूर

४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद.

५) मुख्य वनसंरक्षक (भूमी अभिलेख कक्ष), नागपूर.

६) वनसंरक्षक (भूमी अभिलेख), पनवेल.

७) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.

८) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

९) वित्त विभाग, व्यय १०/ अर्थसं-४ मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१०) कार्यासन अधिकारी (फ-२) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

११) कार्यासन अधिकारी, ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१२) निवडनस्ती, कार्यासन (फ-३), म.व.व.वि., मंत्रालय, मुंबई-३२.